केंद्र / राज्य पुरस्कृत सुरक्षित शहर प्रकल्पांतर्गत मुंबई शहरासाठी महिला सुरक्षितता पुढाकार योजना प्रकल्प अंमलबजावणी समिती गठीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्रमांक : पीएडब्ल्यू- १११७ /प्र.क्र.७१९/विशा-६

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक:- ०८/०३/२०१९

वाचा- १) शासन निर्णय,गृह विभाग, क्रमांक : पीएडब्ल्यू- १११७ /प्र.क्र.७१९/विशा-६, दि.३१/०१/२०१९

२) पोलीस आयुक्त, मुंबई कार्यालयाचे पत्र क्र. ओ. एडब्ल्यू.नं.४२/सी.पी./ॲडिशनल सी.पी./क्राईम/२०१९, दि. ०६/०२/२०१९

३) गृह विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. २/२/२०१८-NERS(WS-II), दि. २८/०९/२०१८ (मार्गदर्शक सूचना)

प्रस्तावनाः-

सार्वजनिक ठिकाणी महिलांवर होणा-या अत्याचाराच्या घटनांवर परिणामकरीत्या आळा घालण्याच्या दृष्टीने व त्यांच्या सुरक्षिततेसंदर्भात कायमस्वरुपी उपाययोजना करण्यासाठी केंद्र शासनाच्या गृह तसेच महिला व बाल कल्याण मंत्रालयाने सुरक्षित शहर प्रकल्पांतर्गत महिला सुरक्षितता पुढ़ाकार योजना राबविण्यासंदर्भात देशातील मुंबई शहराची निवड करून सदर योजना राबविण्यास मान्यता दिलेली आहे. सदर योजना सन २०१८-१९ ते सन २०२०-२१ या तीन वर्षात राबविण्यात येणार असुन योजनेमध्ये केंद्र/ राज्य हिस्सा ६०:४० या प्रमाणात आहे. प्रस्तुत योजनेसाठी केंद्र शासनाने रु.२५२.००कोटी इतक्या निधीस मान्यता प्रदान केली आहे. यानुसार मंत्रीमंडळाच्या दि.२२/०१/२०१९ च्या बेठकीत मंत्रीमंडळाने मान्यता दिली आहे. सुरक्षित शहर प्रकल्प अंतर्गत मुंबई शहरासाठी मंजूर निधीच्या अनुषंगाने मंजूर केलेल्या रु. २५२.०० कोटीपैकी ६० % प्रमाणे केंद्र हिस्सा १५१.२० कोटी व ४०% प्रमाणे राज्य शासनाचा हिस्सा रु. १००.८० कोटी इतका असणार आहे. सुरक्षित शहर प्रकल्प अंतर्गत दिलेल्या मान्यतेनुसार मुंबई शहरासाठी महिला सुरक्षितता पुढाकार योजनेतील शिर्षनिहाय खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

(रू. कोटीत)

अ.क्र. Sr.No.	शिर्षनिहाय Heads	तपशिल Particulars	रक्कम Amount	टक्केवारी Percentage
१.	तंत्रज्ञान विषयक Technology	देखरेख , दृश्य स्वरूपातील संवेदनशील ठिकाण, मागोवा व निराकरण , सामाजिक प्रसार माध्यमांचा दुरूपयोग करणा-यांचा शोध घेणे / सायबर न्यायवैद्यक व मोबाईल डाटा टर्मिनल्स विकसित करणे. Surveillance, SOS Hotspot, Track-me Solution, Social Media Abuse Tracking / Cyber Forensics, Mobile Data Terminals	१८०.००	७१.३९
२.	क्षमता विकास Capacity Building	अधिकारी प्रशिक्षण Training of Officers	२०.००	७.९३

३.	प्रसिध्दी / जागरूकता Awareness	पोलीस दिदी, सामाजिक आणि मुद्रीत माध्यमे, कार्यक्रम Police Didi, Social & Print Media, Events	२२.००	८.७२
४.	Outreach	मदत व पुनर्विलोकन कक्ष, गस्त आणि प्रतिसाद, वाहने, सामाजिक सर्वेक्षण Helpline & Review Desk , Patrol & Response Vehicles, Social Survey	२३.००	९.१२
५.	संकीर्ण Miscellaneous	प्रकल्प व्यवस्थापन खर्च , तृतीय पक्ष लेखापरीक्षण Project Management Cost, ३rd Party audit	७.१५	२.८४

पोलीस आयुक्त, मुंबई कार्यालयाचे संदर्भीय क्र. २ च्या पत्राच्या अनुषंगाने मुंबई शहर महिला सुरक्षितता पुढाकार योजनेची काटेकोरपणे व परिणामकारक अंमलबजावणी करण्याकरीता तसेच प्रभावीपणे निर्णय घेण्याकरीता प्रकल्प अंमलबजावणी समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णयः-

१. मुंबई शहर महिला सुरक्षितता पुढाकार योजनेची काटेकोरपणे व परिणामकारक अंमलबजावणी करण्याकरीता तसेच प्रभावीपणे निर्णय घेण्याकरीता प्रकल्प अंमलबजावणी समितीची रचना खालीलप्रमाणे गठीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१	प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग	अध्यक्ष
२	आयुक्त / अतिरिक्त पोलीस आयुक्त, मुंबई	सदस्य सचिव
३	आयुक्त / अतिरिक्त आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका	सदस्य
४	सचिव / आयुक्त, महिला व बाल विकास विभाग	सदस्य
५	प्रधान सचिव (परिवहन) / आयुक्त,परिवहन	निमंत्रित सदस्य
६	सचिव/ संचालक , शालेय शिक्षण विभाग	निमंत्रित सदस्य
७	व्यवस्थापकीय संचालक, बेस्ट, मुंबई	निमंत्रित सदस्य
८	संचालक, रेल्वे, मुंबई.	निमंत्रित सदस्य
९	महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई	निमंत्रित सदस्य

२. सदर योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी संदर्भिय क्र.०३ येथील शासन निर्णयानुसार गठीत राज्यस्तरीय उच्चतम समिती विनंती प्रस्तावास (RFP) मान्यता देईल.

३. उपरोक्त समितीमार्फ़त प्रस्तुत योजनेची निविदा प्रसिध्द करणे,निविदापूर्व बैठक आयोजीत करणे, निविदा प्राप्त करणे, प्राप्त निविदांचे तांत्रिक व वित्तिय मुल्यमापन करून पुरवठादाराच्या अंतिम निवडीबाबत उपरोक्त समितीने राज्यस्तर उच्चस्तरीय समितीस अहवाल सादर करावा. राज्यस्तरीय उच्चतम समितीमार्फत अंतिम पुरवठादाराची निवड करण्यात येईल.

४. पुरवठादाराच्या निवडीनंतर सदर योजनेसंदर्भात करारनामा करणे, इरादापत्र देणे व कार्यादेश देणे इ.बाबतची प्रक्रिया पोलीस आयुक्त, मुंबई यांनी किंवा त्यांनी प्राधीकृत केलेल्या अतिरिक्त पोलीस आुयक्त दर्जाच्या अधिकाऱ्यामार्फत राबविण्यात यावी.

५. सदर प्रकल्पाची अंमलबजावणी व देखरेख करण्याची कार्यवाही प्रधान सचिव (विशेष)(गृह) यांच्या अध्यक्षतेखालील उपरोक्त समितीमार्फत करण्यात यावी. सदर समितीने योजनेच्या कामकाजाचा वेळोवेळी आढावा घेण्यात यावा.

६. हा शासन निर्णय दि. २२/०१/२०१९ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत सदर योजनेस दिलेल्या मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

७. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१९०३१११७२९०१५१२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Kathawate Ganesh Mohan

Digitally signed by Kathawate Ganesh Mohan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ddf28fd1f8f29ff8697fe818d6972a7b4a8f157 1332ccbea3052a34fcfc7f539, serialNumber=9f40ba5d0001001e5d7fb08f1f09fa725 4742312881f9048102f68cd0ed7649f, cn=Kathawate Ganesh Mohan
Date: 2019.03.11 17:32:42 +05'30'

(गणेश काथवटे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा / विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन,मुंबई
४) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे प्रधान सचिव
५) सचिव,महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय मुंबई.
६) प्रधान सचिव (परिवहन), मंत्रालय मुंबई.
७) अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई.
८) व्यवस्थापकीय संचालक, बेस्ट, मुंबई.
९) संचालक, रेल्वे, मुंबई.
१०) महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई
११) मा.राज्यमंत्री (गृह/ शहरे) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१२) मा.राज्यमंत्री (गृह/ ग्रामीण), वित्त व नियोजन यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१३) पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य,मुंबई.
१४) पोलीस आयुक्त, मुंबई.
१५) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
१६) आयुक्त, महिला व बालविकास, पुणे
१७) वित्त विभाग (का.व्यय-७),मंत्रालय,मुंबई.
१८) निवड नस्ती (विशा-६) कार्यासन ,गृह विभाग, मंत्रालय,मुंबई.